# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.११/०५/२०२३

<u>प्रेसनोट</u>

**दिनांक ०४.०३.२०२३ रोजी वसई विरार शहर महानगरपालिकेच्या विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा पूर्व, सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) आणि बोळींज सामान्य रुग्णालय, विरार (प.) या तीन रुग्णालयांत महानगरपालिकेमार्फत प्रत्येक आठवडयातून दोन दिवस ओ.पी.डी. तत्वावर आयुर्वेदीक दवाखाने सुरु करण्यात आले आहेत. माहे मार्च २०२३ मध्ये विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा पूर्व या रुग्णालयात १०७ रुग्ण, सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) या रुग्णालयात १३७ रुग्ण आणि बोळींज सामान्य रुग्णालय, विरार (प.) या रुग्णालयात १२२ रुग्ण असे एकुण ३६६ रुग्णांनी तसेच माहे एप्रिल २०२३ मध्ये विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा पूर्व या रुग्णालयात २१५ रुग्ण, सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) या रुग्णालयात १७२ रुग्ण आणि बोळींज सामान्य रुग्णालय, विरार (प.) या रुग्णालयात १७० रुग्ण असे एकुण ५५७ रुग्णांनी आयुर्वेदीक उपचारांचा लाभ घेतला आहे.**

**सदर रुग्णांपैकी संधिवात, उदर विकार, त्वचारोग, स्थौल्यजन्य आजार** (Obesity) **या जुनाट आजारांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. सदर आयुर्वेदीक बाहयरुग्ण विभाग सर डी.एम.पेटीट रुग्णालय, वसई (प.) येथे सोमवार व गुरुवार, बोळींज सामान्य रुग्णालय, विरार (प.) येथे मंगळवार व शुक्रवार तसेच विजयनगर-तुळींज रुग्णालय, नालासोपारा पूर्व येथे बुधवार व शनिवार या दिवशी सुरु असते.तरी सर्व संबंधितांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वैद्यकीय आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे.**

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका